| Serial No. | Book Name | Summary |
| --- | --- | --- |
| 1 | अंकांची गोष्ट | मुलांना मोजायला मदत करण्याचा एक प्रेरणादायक मार्ग. कांस्यपदक विजेता आणि अत्यंत शिफारसीय. " |
| 2 | कैलासातील कारस्थान | भुवनेश्वर येथील मंदिरातील यक्षीच्या पुतळ्याचे मस्तक चोरीला जाते. ते खरेदी करणारा अमेरिकन विमान अपघातात मरण पावतो. भारतातील अमूल्य शिल्पांची तस्करी रोखण्यासाठी यक्षीच्या मस्तकाच्या चोरीचा मागोवा घेत फेलूदा, तोपशे आणि जटायू थेट वेरुळच्या गुंफांपाशी पोहोचतात. परंतु तेथे बॉलिवुडच्या एका चित्रपटाचे शुटिंग करण्यासाठी आलेले फिल्म युनिट आणि अचानक झालेला एक खून यामुळे गुंतागुंत कमालीची वाढते. बदमाशांनी आणखी एखादा पुतळा चोरण्यापूर्वी फेलूदा आपले सारे कौशल्य वापरून या प्रकरणाची उकल करतो. |
| 3 | मी छोटी आहे | मी लहान आहे का? "- तमियाला खात्री नाही आणि ती तिच्या प्रवासामध्ये भेटत असलेल्या विविध प्राण्यांना विचारत राहते. अखेरीस तिला आश्चर्यकारक उत्तर सापडते ... |
| 4 | कंपनी चालली सूर्याकडे | कॅप्टनसाहेब, कोणापुढे शरण जाणे ही माझी धारणा नाही. माझ्या स्वभावधर्माला ते मानवण्यासारखे नाही."<br>"काऊंटसाहेब, मीही आपल्याला आदबीने पण अत्यंत निक्षून सांगू इच्छितो की, माझी मनोधारणा तंतोतंत आपल्यासारखीच आहे."<br>"आपण हे मनापासून सांगता आहात हे मान्य केले तरी कॅप्टनसाहेब, मी प्रथम आलो हे तर खरं ना?"<br>"काऊंटसाहेब, काही प्रसंग असे असतात की कुठेही केवळ प्रथम आल्याने काही खास अधिकार प्राप्त होत नाही."<br>"ठीक आहे, कॅप्टनसाहेब, शब्दांचा हा वाद आपण संपवू या."<br>"अत्यानंदाने, काऊंटसाहेब."<br>"वाद मिटवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे द्वंद्व. आणि साधन म्हणजे मला वाटतं तलवार, होय ना?"<br>"मला वाटतं, पिस्तूललही काही कमी ठरत नाही."<br>"हे माझे कार्ड घ्यावे आपण, कॅप्टनसाहेब."<br>"आणि माझे हे कार्ड स्वीकारण्याची कृपा आपण करावी, काऊंट साहेब."<br>शब्दांची चकमक इथवर तलवारीच्या घावांसारखी सपासप चालू होती. शेवटी कार्डांची झालेली परस्पर देवाणघेवाण तर इतकी शीघ्र होती की शस्त्राघात त्यापुढे काहीच नाही. दोघांनी हातातल्या कार्डाकडे पाहिले आणि आदबपूर्वक एकमेकांचा निरोप घेतला.<br>एका कार्डावर छापले होते : |
| 5 | भारतीय गुप्तरचनेतील गुढगाथा | भारतीय गुप्तचर यंत्रणेची रहस्यमय कथा रॉ म्हणजे काय? ते कसे कार्य करतात? |
| 6 | फास्टर फेणे डिटेक्टिव्ह | ज्येष्ठ साहित्यिक भा. रा. भागवत यांच्या लेखणीतून साकारलेला साहस वीर फास्टर फेणे यांची अजून एक साहस कथा |

| | | |
|---|---|---|
| 7 | तेनाली रामच्या चातुर्य कथा | तेनालीराम म्हणजे असाच एक बिरबलचा भाईबंद. तसाच बुद्धिमान नि चतुर, हजरजबाबी नि तल्लख. तेनालीराम ही काही कल्पित व्यक्ती नाही; ऐतिहासिक आहे. विजयनगरचे सम्राट राजा कृष्णदेवराय यांच्या दरबारी नवरत्ने होती; अकबर बादशहाप्रमाणेच त्यांतील तेनालीराम हे एक आपल्या बुद्धिचातुर्याने शोभणारे रत्न! तेनालीरामच्या अनेक चातुर्यकथा विशेषतःदक्षिण भारतातील लोकांच्या तोंडी पिढ्यान्पिढ्या घोळत आलेल्या आहेत. त्यांतीलच या काही कथा मी माझ्या भाषेत लिहिलेल्या आहेत. अशा कथांच्या श्रवण-वाचनाने मनोरंजन होतेच होते, पण बुद्धिलाही खाद्य मिळते. ती सतेज, टवटवीत बनते. लहान-थोरांना या कथा आवडतील अशी आशा आहे. |
| 8 | बाल मित्र | बालमित्र हे मराठी शिकण्याचे सोपे साधन आहे .असे मराठी माध्यम नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे खूप उपयुक्त आहे. आणि मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी हे सर्वोत्कृष्ट आहे. ज्यांना मराठी शिकायचे आहे त्यांना उपयुक्त . |
| 9 | फास्टर फेणेची डोंगरभेट | खंडाळ्याच्या घाटातून गाडी झपाट्याने जात होती. बोगद्यामागून बोगदे मागे पडत होते. चिकार गर्दी असलेल्या त्या डब्यात संडासाला टेकून एक मुलगा उभा होता. डोंगरखोरी, त्यातून वाहणारे पाण्याचे ओहोळ, धबधबे, प्रचंड वृक्ष नि वेली-झुडपे, सारे एका मुलाला मनापासून प्रिय. दऱ्याखोऱ्यांतून हिंडताना त्याचे भान हरपायचे; पण आता या क्षणाला मात्र त्याची नजर शून्य वाटत होती. कारण त्याला एकच प्रश्न सारखा सतावत होता किशादादाला काय प्रेझेंट द्यायचं? किशादादा त्याचा मावसभाऊ. वयाने त्याच्यापेक्षा मोठा. कमर्शियल आर्टिस्ट. त्याचे लग्न आता दोन दिवसांवर आलेले, म्हणूनच हा मुंबईला निघाला होता. तुमच्या ओळखीचा आहे की हा पोरगा! अंगातला चौकड्यांचा शर्ट, किडकिडीत शरीर, टप्पोरे डोळे अन् कपाळावर लोंबणारे ते झुलूप. आले ना लक्षात? नक्कीच. त्याशिवाय नाही त्या पोरासारखेच तुम्ही 'ट्टॉक्' केलेत! हे लग्नाचे प्रेझेंट म्हणजे बनेश ऊर्फ फास्टर फेणेपुढे उभी राहिलेली एक समस्याच होती. खरे म्हणजे त्याचे वय अवघे तेरा-चौदा वर्षांचे. या पोरवयात त्याने कुणाला प्रेझेंटबिझेंट द्यायची जरूर होती असे नाही. कुणी त्याच्याकडून तशी अपेक्षाही केली नसती. घरची वडील माणसे देणारच होती की प्रेझेंट. पण-पण |

| | | |
|---|---|---|
| 10 | प्रतापगडावर फास्टर फेणे | बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. प्रतापगड त्या दिवशी झिणझिणत होता. त्यानंतर अवघ्या तीन तासांत पृथ्वीच्या पोटात जे काही घडले, त्यामुळे माझ्या या विधानाला आणखीनच बळकटी येते आणि तरी त्या क्षणाला थोडीच कुणाला कल्पना होती? पण थांबा. अशी एकदम फास्टर फेणेसारखी उडी मारणे बरे नाही. ज्या वेळचे त्या वेळी सांगावे हेच बरे. प्रतापगडाला झिणझिण्या येत होत्या असे म्हणण्याचे माझे कारण आपले दर्शनी अन् आलंकारिक आहे. मुंग्यांची रांगच रांग किल्याच्या पाठीवरून चढत होती. काळ्या-तांबड्या नाही. पांढऱ्या शुभ्र धावऱ्या-चावऱ्या मुंग्यांची रांग. म्हणजे दुरून पाहणाऱ्याला त्या पांढऱ्या मुंग्या वाटल्या असत्या. किंवा फार तर मुंगळे. खरे तर ते पुण्याच्या विद्याभवन हायस्कूलचे मुलगे होते. त्यांच्यातला तो स्कॉलरब्रुव शरद शास्त्री, जन्या जोशी नि चकोर देशमुख, सुभाष देसाई वगैरे काही नग तुम्हांला माहीत असतील. निदान तो शेवटला नंबर तरी. कारण सुभाष ज्याचा जानी दोस्त तो किडकिडीत तुडतुडीत पळ्या पोर तुमचाही जानी दोस्त आहे. किंबहुना त्याच्याचसाठी तर हे सारे महाभारत मला लिहावे लागतेय. तो हो! याच विद्याभवनमधला-बनेश ऊर्फ फास्टर फेणे! प्रतापगड चढणाऱ्या त्या मुंगळ्यांमध्ये बारीक कंबरेचा हा वाळकुडा मुंगळाही आहेच. पण तो केव्हाच छलांग मारून फर्लांग पुढे गेला आहे. तो पाहा तिळाएवढा बारीक ठिपका... दिसला? आणि तो मागून चढणारा दुसरा पांढरा तीळ म्हणजे सुभाष देसाई. आपल्या मित्राच्या मागे तोही कडमडत गेलाय. सुभाषची स्पीड अर्थात बन्याच्या मानाने ‘नॉन’ असली, तरी हा गोरा गुटगुटीत मुलगाही कमी तरतरीत नि धाडसी नाही. तसा तो नसता, तर फास्टर फेणेचा कंठमणी बनलाच |
| 11 | रामगणेश गडकऱ्यांचा बालमेवा | राम गणेश गडकरी (जन्म २६ मे १८८५, मृत्यू २३ जानेवारी १९१९) यांनी खास मुलांकरिता म्हणून जेवढे काही लिहिले तेवढे सारे काही या पुस्तकात प्रथमच एकत्रित करण्यात आले आहे. |
| 12 | मुलांसाठी निवडक ज्योत्स्ना | कुमारांसाठी ज्योत्स्ना प्रकाशनच्या विविध पुस्तकातील निवडक गोष्टींचे संकलन. |
| 13 | टाइम मशीन व ग्रँड ट्रॅक एक्सप्रेस | प्रसिध्द लेखक भा. रा. भागवत यांच्या लेखन शैलीतून उतरलेले हे खास पुस्तक |
| 14 | द्यावर्दी सिंदबादच्या सात सफरी | अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी’ या अद्भुत ग्रंथातील पुढील एक गोष्ट विद्यार्थीवर्गासाठी मुद्दाम निराळी काढून प्रसिद्ध करीत आहोत. मूळ ग्रंथ फार विस्तृत व विविध रसांनी परिपूर्ण असल्यामुळे तरूण विद्यार्थ्यांना चटकदार, मनोरंजक व बोधप्रद वाटेल अशी ही गोष्ट मुद्दाम निवडून काढली आहे.<br>सिंदबादने निरनिराळ्या देशांत ज्या सफरी केल्या व व्यापारांत हजारो रूपये कमावले त्या सफरींचा हा वृतांत कल्पित व अद्भुत असला तरी त्यांत निरनिराळ्या देशांची जी माहिती आली आहे ती तरूण वाचकांना अनेक दृष्टींनी उद्बोधक व स्फूर्तीदायक वाटल्याशिवाय राहणार नाही. इंग्रजी वाङ्मयांत रॉबिन्सन क्रूसो व गलिव्हर्स ट्रॅव्हल्स वगैरे पुस्तकें वाचून जशी तिकडील वाचकांच्या मनांत प्रवासाची स्फूर्ति उद्भवली तसाच सुपरिणाम ह्या सिंदबादच्या सफरी वाचून आपल्याकडील तरूणांच्या बाबतीत व्हावा व देशोदेशी प्रवास करून त्यांना नवीन ज्ञान संपादन करण्याची प्रेरणा व्हावी अशी आम्ही आशा करितो.<br>आपल्याकडे पंचतंत्र, हितोपदेश, कथासरितासागर इत्यादि नीतिकथांचे संग्रह आहेत. पण त्यांत अरबी भाषेतील गोष्टीप्रमाणे अद्भुत रस नाहीत. आणि तरूण विद्यार्थ्यांना तर चमत्कारिक व अद्भुत गोष्टी वाचण्याची मनापासून गोडी असते. सिंदबादच्या वृतांतात कल्पनाही करता न येणाऱ्या अद्भुत गोष्टी आहेत, शिवाय त्यांपासून तरूण वाचकांना बोध, मनोरंजन व स्फूर्ति यांचाही लाभ होणार असल्यामुळे शालेय अधिकारी व शाळा खाते यांच्याकडून सिंदबादच्या सफरींचे योग्य चीज केले जाईल अशी आशा आहे. |

| | | |
|---|---|---|
| 15 | दोन कथा | आज-काल बालपण संपायच्या आत मुलं वयात येतात आणि वयात येण्यापूर्वीच मोठी होतात ... रिमांड होममधील घुसमटते वातावरण आणि वेश्यावस्तीतील गुदमरते बालपण घेऊन येत आहे ... दोन कथा |
| 16 | मुलांसाठी लहान आणि सुलभ कथा | स्प्रिंगफिल्ड मराठी भाषेतील मराठी भाषेतील कथा संग्रहित करतो. या कथांमध्ये असे लिहिले आहे की ते आपल्या मुलांसाठी सोपे आणि वाचण्यास सोपे आहेत. स्वतःसाठी एक नमुना नमूना डाउनलोड करा |
| 17 | सन्मान | एक साहस ही अशी घटना किंवा मालिका असते जी बऱ्याचदा शारीरिक कृतीतून मुख्यत्वे धोक्यासह नायकांच्या सामान्य जीवनाबाहेर घडते. साहसी कथा जवळजवळ नेहमीच द्रुतपणे पुढे सरकतात आणि कथानकाची गती कमीतकमी तेवढीच महत्वाची असते जसे की वैशिष्ट्यीकरण, सेटिंग आणि सर्जनशील कार्याचे इतर घटक.<br>लिखित कल्पित साहित्याच्या सुरुवातीच्या दिवसांपासून साहसी ही एक सामान्य थीम आहे. खरंच, मध्ययुगीन प्रणयांचा मानक प्लॉट साहसी मालिका होता. हेलियोडोरस इतक्या जुन्या कथानकाच्या चौकटीचे पालन करून आणि हॉलिवूड सिनेमांमध्ये अद्याप जिवंत राहण्याइतके, एखाद्या नायकाला आपल्या बाईला भेटण्यापूर्वी प्रथम आव्हानांचा सामना करावा लागतो. दुसऱ्या आव्हानांचा एक संच पुन्हा एकत्रित होण्यापासून विभक्त होईल. |
| 18 | परी कथा | तुम्ही कधी परी पाहिली आहे? मी पाहिलीय. मी पण तुमच्या एवढा लहान होतो ना, तेंव्हा! शाळेतून घरी येत होतो तेंव्हा घसरून पडलो होतो. आणि मग रडत बसलो, माझ्या गुडघ्याला थोडा बाऊ झाला म्हणून. पण ... मग एका झाडामागून एकदम एक गोड मुलगी आली. तिला अगदी नाजूक पंख होते. ती उडत उडत माझ्यापाशी आली. आणि तिच्या हातातील जादूची छडी तिने माझ्याभोवती फिरवली. त्यातून चमचम चांदण्या बाहेर पडल्या. आणि मी रडायचा थांबलो. ती माझ्याकडे बघून हसली आणि पंख हलवत गायब झाली. मी घरी येऊन आईला सांगितलं पण आई हसून निघून गेली. त्यानंतर मी ही गंमत कुणालाच सांगितली नाही. तुम्हाला अशाच अजून पऱ्यांच्या गंमतीजंमती ऐकायच्या आहेत? वाचा तर मग.... |
| 19 | त्या एका दिवशी | मुलांसाठी दोन दीर्घकथा - 'त्या एका दिवशी' आणि 'मला क्रियापद भेटते तेव्हा'.<br>त्या एका दिवशी<br>गौतमचं खरं म्हणजे आपल्या आईबाबांवर प्रेम होतं; पण हल्ली काहीतरी बिनसलं होतं.<br>त्याला त्यांचं काहीच पटेनासं झालं होतं. पूर्वी असं होत नसे. मग उन्हाळ्याच्या सुट्टीत त्या एका दिवशी<br>बाबाबरोबर केलेला प्रवास एक वेगळाच अनुभव देऊन गेला आणि आई-बाबांना जाणवलं,<br>की गौतम आता मोठा झाला आहे; मोठा, शहाणा आणि समजूतदार....<br><br>मला क्रियापद भेटले तेव्हा...<br>‘मला क्रियापद भेटले तेव्हा...’ हा काय निबंधाचा विषय आहे?<br>पण सरांनी तो दिला आणि चिन्मयीची चिडचिड झाली.<br>पण लिहिता लिहिता तिला एका क्रियापदाबरोबर झालेल्या कितीतरी भेटीगाठी आठवत गेल्या :<br>मजेदार, हळव्या, दुखऱ्या, मनाच्या आतल्या कप्प्यात जपून ठेवाव्यात अशा आठवणी. |
| 20 | अंतरीच्या गुढगर्भि | अंतरीच्य गुढी गरबी ही मराठीची नाभी आहे. चित्रा नानिवडेकर यांनी लिहिलेले. |

| | | |
|---|---|---|
| 21 | मुशाफिरी आवडलेल्या देशाची | मुशाफिरी आवडलेल्या देशांची हे प्रवासवर्णन लेखिका - सुवर्णा अशोक मयेकर. या पुस्तकात खालिल देशांचा समावेश आहे.<br>केनिया - जंगल सफारी व मसाईमाराची सहल, निसर्गरम्य सिक्कीम, सौंदर्याने नटलेले कलासक्त फ्रान्स, जर्मनी युरोपातील मोठा देश<br>स्विझरलँड पृथ्वीवरचे नंदनवन , स्वप्नातला युरोप प्रत्यक्षात साकारलेले, रोम एक ऐतिहासिक शहर, एक झलक -अमेरिका वारीची, |
| 22 | गंगा टोकमधील गडबड | निसर्गरम्य गंगटोक इथे फेलूदा व तोपशे सुटी घालवायला आलेले असतात. तिथे एका कारखानदाराची गूढ हत्या होते, अगदी विलक्षण पद्धतीनं. संशय तर अनेकांवर असतो. मृत कारखानदाराचा भागीदार शशधर बोस, लांब केसाचा परदेशी हेल्मुट, रहस्यमय डॉ. वैद्य, एवढंच काय भित्रट सरकारवर देखील संशयाची सुई असते. अनेक गाठी, निरगाठी, कठीण मुद्दे आपल्या नेहमीच्या तेजस्वी कौशल्याने फेलूदा सोडवतो आणि गुन्हेगाराचा माग लावतो. वाचलेच पाहिजे असे हे रोमहर्षक रहस्य.<br>सत्यजित रे लिखित किशोरवयीन, तरुण व सर्वच वाचकवर्गाला खिळवून ठेवणाऱ्या ‘फॅन्टॅस्टिक फेलूदा’ रहस्यकथांच्या १२ पुस्तकांपैकी हे दुसरे पुस्तक.<br><br>विश्वविख्यात चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांनी फॅन्टॅस्टिक फेलूदाच्या मूळ रहस्यकथा बंगालीत लिहिल्या आहेत. गुप्तहेर फेलूदा, तोपशे, जटायू या मध्यवर्ती व्यक्तिरेखांभोवती चित्तथरारक व उत्कंठावर्धक अशा १२ कादंबऱ्या गुंफल्या आहेत. यात रहस्य आहे पण अनाकलनीय गूढ नाही, हिंसा आहे पण हिंस्त्रपणा नाही.<br>या कथा चित्तथरारक आहेत पण यात भडकपणा नाही. गुंतागुंतीच्या या खिळवून टाकणाऱ्या कथा भारतातील विविध राज्यात, शहरात घडतात असं दाखवून सत्यजित रे यांनी रहस्य, साहस व पर्यटन यांचा रंजक मिलाफ साधला आहे. प्रथितयश अनुवादक अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या या कादंबऱ्या केवळ किशोरवयीनांनाच नव्हे तर आबालवृद्धांनाही खिळवून ठेवतील हे निश्चित! |
| 23 | नळ दमयंती आणि इतर कथा | संस्कृत साहित्यातील दहा प्रसिद्ध साहित्यकृती यात मराठी ललितकथांच्या स्वरूपात अवतरल्या आहेत. संस्कृत भाषेची जाण नसलेल्या मराठी वाचकाला या पुस्तकाच्या रूपाने कालिदास, भास, शूद्रक, अश्वघोष, श्रीहर्ष, बाणभट्ट अशा संस्कृत साहित्यकारांच्या रचनांचा आस्वाद घेता येईल. मूळ कथांचे हे केवळ अनुवाद किंवा भावानुवाद नाहीत. डॉ. संगीता बर्वे यांनी आपल्या प्रवाही आणि रसाळ शैलीत केलेली ही नवनिर्मिती आहे. |

| | | |
|---|---|---|
| 24 | काठ मांडूतील कर्दन काळ | कोलकात्याच्या हॉटेलमधील एका अनोळखी इसमाच्या खुनाचा माग काढत फेलूदा व त्याचे मित्र काठमांडूत त्यांचा जुना शत्रू मगनलाल मेघराजच्या थेट गुहेत जाऊन पोहोचतात. स्वयंभूनाथ येथे घडलेली एक घटना, प्रार्थनाचक्रांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर आकस्मिक छापा, कॅसिनोतील एक थरारक रात्र आणि एलएसडीमुळे जटायूंची झालेली घनचक्कर अवस्था या सर्व गोष्टींमुळे हे साहस भलतंच रंजक, रोचक व रोमहर्षक होऊन जातं. अखेर सनसनाटी उत्कर्षबिंदूच्या वेळी चलाख फेलूदा नकली औषधांचा घोटाळा उघडकीस आणून पुन्हा एकवार यशस्वी होतो.<br>सत्यजित रे लिखित किशोरवयीन, तरुण व सर्वच वाचकवर्गाला खिळवून ठेवणाऱ्या ‘फॅन्टॅस्टिक फेलूदा’ रहस्यकथांच्या १२ पुस्तकांपैकी हे शेवटचे पुस्तक.<br><br>विश्वविख्यात चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांनी फॅन्टॅस्टिक फेलूदाच्या मूळ रहस्यकथा बंगालीत लिहिल्या आहेत. गुप्तहेर फेलूदा, तोपशे, जटायू या मध्यवर्ती व्यक्तिरेखांभोवती चित्तथरारक व उत्कंठावर्धक अशा १२ कादंबऱ्या गुंफल्या आहेत. यात रहस्य आहे पण अनाकलनीय गूढ नाही, हिंसा आहे पण हिंस्त्रपणा नाही.<br>या कथा चित्तथरारक आहेत पण यात भडकपणा नाही. गुंतागुंतीच्या या खिळवून टाकणाऱ्या कथा भारतातील विविध राज्यात, शहरात घडतात असं दाखवून सत्यजित रे यांनी रहस्य, साहस व पर्यटन यांचा रंजक मिलाफ साधला आहे. प्रथितयश अनुवादक अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या या कादंबऱ्या केवळ किशोरवयीनांनाच नव्हे तर आबालवृद्धांनाही खिळवून ठेवतील हे निश्चित! |
| 25 | माझ्या आवडत्या गोष्टी | काळ, देश, धर्म यांच्यापलीकडे जाऊन पिढ्यान्‌पिढ्या परंपरेने चालत आलेल्या, आजही टिकून असलेल्या आणि तेवढ्याच आवडीने ऐकल्या आणि वाचल्या जाणाऱ्या देशविदेशांमधल्या आणि भारतामधल्या गोष्टी या पुस्तकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.<br><br>`लीची' ही चिनी कथा, `प्रार्थना' ही रशियन कथा, `जगणं' ही इजिप्शियन गोष्ट, मोरोक्को देशातली `एका नदीची गोष्ट', हिमालयाच्या कुशीतली `दावाची गोष्ट' अशा निरनिराळ्या ठिकाणच्या गोष्टींबरोबरच `गाडगेबाबा' यांच्यापासून आधुनिक संतांपर्यंतच्या गोष्टीही राजा मंगळवेढेकरांनी खास आपल्या शैलीत सांगितल्या आहेत.<br><br>`जे चांगलं असतं, ते टिकतं' या उक्तीचा प्रत्यय देणाऱ्या या निवडक गोष्टी आजही चवीने ऐकल्या आणि वाचल्या जातात. |

| | | |
|---|---|---|
| 26 | मृत्यू घर | एका मौल्यवान हस्तलिखिताचा शोध घेत असताना फेलूदा व त्याच्या सोबत्यांना चमत्कारिक व भयंकर माणसं भेटतात आणि फेलूदाला एक रक्त गोठवणारं गूढ व गहन प्रकरण सोडवावं लागतं. हस्तलिखिताचे संग्राहक जी. जी. सेन, त्यांचा चिटणीस निशीथ, वन्यजीवन फोटोग्राफर बिलास मजुमदार व ज्योतिषी लक्ष्मण भट्टाचार्य यांच्यात एक थंड डोक्यानं काम करणारा गुन्हेगार असतो आणि उशीर होण्यापूर्वी त्याला थांबवायचं असतं. जगन्नाथ पुरीच्या सागर किनाऱ्यावर समुद्राइतकीच गूढ, गहिरी व गुंतवून टाकणारी ही थरारक गोष्ट.<br>सत्यजित रे लिखित किशोरवयीन, तरुण व सर्वच वाचकवर्गाला खिळवून ठेवणाऱ्या 'फॅन्टॅस्टिक फेलूदा' रहस्यकथांच्या १२ पुस्तकांपैकी हे अकरावे पुस्तक.<br><br>विश्वविख्यात चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांनी फॅन्टॅस्टिक फेलूदाच्या मूळ रहस्यकथा बंगालीत लिहिल्या आहेत. गुप्तहेर फेलूदा, तोपशे, जटायू या मध्यवर्ती व्यक्तिरेखांभोवती चित्तथरारक व उत्कंठावर्धक अशा १२ कादंबऱ्या गुंफल्या आहेत. यात रहस्य आहे पण अनाकलनीय गूढ नाही, हिंसा आहे पण हिंस्त्रपणा नाही.<br>या कथा चित्तथरारक आहेत पण यात भडकपणा नाही. गुंतागुंतीच्या या खिळवून टाकणाऱ्या कथा भारतातील विविध राज्यात, शहरात घडतात असं दाखवून सत्यजित रे यांनी रहस्य, साहस व पर्यटन यांचा रंजक मिलाफ साधला आहे. प्रथितयश अनुवादक अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या या कादंबऱ्या केवळ किशोरवयीनांनाच नव्हे तर आबालवृद्धांनाही खिळवून ठेवतील हे निश्चित! |
| 27 | तळ्याचे गुपित | मुंबईतल्या उच्चभ्रू वस्तीत राहणारा रौनक सुट्टीत वडलांच्या बदलीच्या गावी जरा नाखुशीनेच जातो. पण काही दिवसांतच तिथल्या मुलामुलींशी त्याची मैत्री होते.<br><br>यशवंत आणि उदय हे त्याचे गावातले मित्र रौनकलाही तळ्यातलं गुपित सांगतात आणि आपल्या कंपूत सामील करून घेतात. गावातली जीवनशैली, तिथल्या लोकांच्या बोलण्या-वागण्यातला मोकळेपणा, आपलेपणा रौनाकला आवडू लागतो. काही दिवसांतच तो तिथे रमून जातो...<br><br>या पुस्तकाला साने गुरुजी आरोग्य मंदिरातर्फे दिला जाणारा २०१५ सालचा<br>'पार्वतीबाई आव्हाड स्मृती राज्यस्तरीय उत्कृष्ट बालवाङ्मय पुरस्कार' मिळाला आहे. |

| | | |
|---|---|---|
| 28 | चिमनगाणी बालगीते | चिमणगाणी' प्र.श्री. जाधव यांची ही बालगीते लहान मुलांना तर खिळवून ठेवतातच, पण मोठ्यांनाही ती ताल धरायला लावतात... गुणगुणायला लावतात... सुस्वरता, सुलभता नि सुलयता, ही या गीतांची वैशिष्टये होत,<br><br>घराचं अंगण ओलांडून शाळेच्या प्रांगणात पाऊल ठेवलेली मुलं घर, समाज नि शाळा या त्रिकुटातून जीवनाचं मेतकूट बनवू पाहतात. सोबत असलेले संस्कार गुरुजनांची शिकवण, सोबत्यांचा सहवास नि पालकांचा आग्रह यातून जीवनाची कालक्रमणा करीत असतात.<br><br>मनातला प्रचंड उत्साह, जिद्द आणि यशस्वी होण्याची तळमळ... त्यासाठी करावी लागणारी प्रयत्नाची पराकाष्ठा यातूनही ती विरंगुळा शोधीत असतात. मग अलगद ओठांवर येतात ती ही 'चिमणगाणी'....<br>काहीतरी सतत गुणगुणावेसे वाटते. गाण्यासोबत बागडावे वाटते. मित्रासोबत मनसोक्त हुंदडावे वाटते... यातच त्यांना जवळची वाटतात ती गाणी...मनातला भाव, अंगातला जोष, सहकार्याची साथ आणि यासोबतच हवी असतात अशी 'चिमणगाणी'...<br>मुकल्यांसाठी. मुलांच्या विश्वातील त्यांच्या कृती, उक्ती आणि शक्तीला प्रेरणा देणारी... सोबतच विवेक,चातुर्य, विज्ञाननिष्ठा, पर्यावरण जागृती, एकात्मता संदेश, अखंडतेची जाण, शिस्त-शिकस्त शिकविणारी सहज संस्कार करणारी ही सुंदर गाणी...! चला तर गाऊ या...' चिमणगाणी'..!! |
| 29 | होय मी सुद्धा | मोहन एकदा वाण्याकडे सामान घ्यायला जातो. घाईगडबडीत वाणीदादा त्याला पन्नास रुपये जास्त देतो. मोहनला ही गोष्ट कळते खरी पण ती आईला न सांगता ती नोट आपल्या खिशातच ठेवतो. त्यानंतर मात्र दिवसभर त्याला ही गोष्ट खटकत राहते. तो अस्वस्थ होतो. आपण चोर आहोत असं त्याला वाटू लागतं. शेवटी तो धीराने निर्णय घेतो आणि आईला आपली चूक कबूल करतो...<br>या गोष्टीतल्यासारखे अनेक प्रसंग आपल्या आयुष्यात घडत असतात किंवा घडून गेलेले असतात. अशा वेळी आपला मुलगा चुकीच्या मार्गाला लागू नये यासाठी त्याला या गोष्टी प्रेरक आहेत.<br>स्वतःचाच शोध घ्यायला प्रवृत्त करणाऱ्या या गोष्टी शिक्षकांनी, मुलांनी आणि त्यांच्या पालकांनी आवर्जून वाचाव्यात. |
| 30 | शामू सर्कस वाला | शमू एक अनाथ व पोरका मुलगा होता. तो एका लांबच्या मावशीकडे राहात असे. दिवसरात्र कष्ट करून त्याला पोटभर खायलाही नीट मिळत नसे. तरीही तो नेहमी आनंदी राहत असे. एकेदिवशी त्याला कळलं की आज गावात सर्कस आली आहे आणि धावत जाऊन त्याने सर्कशीचं ठिकाण गाठलं. शामूला तिथे एक स्टॉलवाला भेटला आणि शामूची हुशारी पाहून त्याने शामूला सर्कसमध्ये काम करशील का असं विचारलं. शामू आश्चर्यचकितच झाला...<br><br>शामूने सर्कशीत केलेल्या करामतींची ही गमतीदार गोष्ट. |
| 31 | कण कण क्षण क्षण | ण क्षण कण कण या पुस्तकामध्ये साहित्यिका: गिरिजा कीर यांच्या जीवनातील काही सकारात्मक आठवणी त्यांनी लिहिल्या आहेत. |

| | | |
|---|---|---|
| 32 | सुलभ रामायण | भारतात युगानुयुगे सांगितल्या जाणाऱ्या रामकथेचे दोन पैलू आहेत. ती भक्तिभावाने ऐकणारे लोक रामायणातल्या सगळ्या आदर्शांची पूजा करतात; त्याच वेळी लहानग्यांना मात्र रामाचे शौर्य, भरताचे बंधुप्रेम, हनुमानाची दास्यभक्ति, बिभीषणाचा धीरोदात्तपणा या आणि अशा आचरणात आणण्यायोग्य अनेक गुणांचा ठेवा रंजकतेने अनुभवायला मिळतो.<br>समोर येणाऱ्या सुखदु:खांचा, कसोटी पाहणाऱ्या कठीण प्रसंगांचा सामना करताना बरेचदा वाट सापडत नाही. अशा वेळी एकवचनी, एकबाणी, मर्यादापुरुषोत्तम रामाची भक्ती आपले दु:ख दूर करण्याचे बळ देते. लहानपणापासून जर असे आदर्श समोर असतील, तर कुठल्याही प्रकारचा पेच सोडवण्यासाठी कशा पद्धतीने विचार करायला लागेल याची गुरुकिल्लीच गवसते.<br>म्हणूनच जोवर माणूस आहे आणि त्याला वाणी व भाषा आहे, तोवर रामायण आहे! |
| 33 | केस अटची केसची | एक धनाढ्य गृहस्थ कालका मेलने प्रवास करत असताना त्याच्या निळ्या अ‍ॅटॅची केसची दुसर्या प्रवाशाच्या केसशी अदलाबदल होते. आपली अ‍ॅटॅची परत मिळवून देण्याचं काम तो गृहस्थ फेलूदावर सोपवितो. सुरुवातीला अगदीच किरकोळ वाटणाऱ्या या केसचं फेलूदाच्या अत्यंत रोमांचकारी साहसात रूपांतर होतं. फेलूदा, तोपशे आणि जटायू अ‍ॅटॅची केसचा शोध घेत घेत सिमल्याला पोहोचतात. तेथे अनपेक्षित वळणे मिळून त्यांचा प्रवास खडतर बनतो. सिमल्याच्या बर्फाळ उतारावर या कथेचा श्वास रोखून ठेवणारा परमोत्कर्ष म्हणजे ताणलेल्या उत्कंठेची परमावधीच.<br>सत्यजित रे लिखित किशोरवयीन, तरुण व सर्वच वाचकवर्गाला खिळवून ठेवणाऱ्या ‘फॅन्टॅस्टिक फेलूदा’ रहस्यकथांच्या १२ पुस्तकांपैकी हे चौथे पुस्तक.<br><br>विश्वविख्यात चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांनी फॅन्टॅस्टिक फेलूदाच्या मूळ रहस्यकथा बंगालीत लिहिल्या आहेत. गुप्तहेर फेलूदा, तोपशे, जटायू या मध्यवर्ती व्यक्तिरेखांभोवती चित्तथरारक व उत्कंठावर्धक अशा १२ कादंबऱ्या गुंफल्या आहेत. यात रहस्य आहे पण अनाकलनीय गूढ नाही, हिंसा आहे पण हिंस्त्रपणा नाही.<br>या कथा चित्तथरारक आहेत पण यात भडकपणा नाही. गुंतागुंतीच्या या खिळवून टाकणाऱ्या कथा भारतातील विविध राज्यात, शहरात घडतात असं दाखवून सत्यजित रे यांनी रहस्य, साहस व पर्यटन यांचा रंजक मिलाफ साधला आहे. प्रथितयश अनुवादक अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या या कादंबऱ्या केवळ किशोरवयीनांनाच नव्हे तर आबालवृद्धांनाही खिळवून ठेवतील हे निश्चित! |
| 34 | गमतीदार गोष्टी | जागतिक वाङ्मयातील प्रसिद्ध परीकथांचा मराठी अनुवाद. |

| | | |
|---|---|---|
| 35 | सुलभ महाभारत | हाभारतात व्यासांनी असंख्य मानवी प्रवृत्तींना मूर्तरूप दिले. महाभारतात जे आहे ते सर्वत्र सापडते आणि इथे जे नाही ते कुठेही सापडत नाही असे म्हटले जाते. सत्तेसाठी खेळलेले चांगले-वाईट डावपेच, त्यांचे परिणाम, नात्यांमधील प्रेम, तेढ, लालसेपोटी ाधलेला स्वार्थ, सूड, निस्वार्थ बुद्धीने घेतलेले निर्णय, दैवापेक्षा प्रयत्नवादावर ठेवला जाणारा विश्वास, पराकोटीचा नीचपणा आणि पराकोटीची उदात्तता या सर्व आणि इतरही अनेक भावभावनांची एक विलक्षण गुंफण महाभारत वाचताना अनुभवायला मिळते.<br>ही कथा केवळ सत्ता मिळवण्यासाठी झालेल्या युद्धाची नाही, तर न्याय मिळवण्यासाठी पांडवांनी आयुष्यभर केलेल्या संघर्षाचीही आहे. कृष्णाने अर्जुनाला केलेल्या, पितामह भीष्मांनी पांडवांना केलेल्या नैतिक मार्गदर्शनाची जशी ती गोष्ट आहे, तशीच धूर्त शकुनीने केलेल्या कपटाचीही आहे.<br><br>मंगळवेढेकरांनी रसाळ आणि ओघवत्या शैलीत सांगितलेल्या या गोष्टी गोपाळ नांदुरकरांच्या चित्रांनी जिवंत केल्या आहेत. |
| 36 | साहस कथा | गीरच्या जंगलात, मुले पळवणारा प्राणी अशा चित्तथरारक कथांचा संग्रह. |
| 37 | बादशहाची अंगठी | प्रख्यात गुप्तहेर फेलूदा आणि त्याचा किशोरवयीन साहाय्यक तोपशे यांच्या ‘बादशहाची अंगठी’ या कादंबरीत साहस, रहस्य आणि गुंतागुंत यांचे वाचकांना खिळवून टाकणारे उत्कंठावर्धक मिश्रण आहे. फेलूदा व तोपशे लखनऊमध्ये सुटी घालवत असताना एक मोगलकालीन अमूल्य अंगठी चोरीस जाते. फेलूदा तपासाला सुरुवात करतो आणि प्रारंभ होतो एका दुष्ट गुन्हेगाराच्या ाठलागाला. हा पाठलाग त्याला थेट लक्ष्मणझुल्यापर्यंत घेऊन जातो. तेथे एका खडखड्या सापाशी त्याला सामना करावा लागतो. सत्यजित रे लिखित किशोरवयीन, तरुण व सर्वच वाचकवर्गाला खिळवून ठेवणाऱ्या ‘फॅन्टॅस्टिक फेलूदा’ रहस्यकथांच्या १२ पुस्तकांपैकी हे पहिले पुस्तक.<br><br>विश्वविख्यात चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांनी फॅन्टॅस्टिक फेलूदाच्या मूळ रहस्यकथा बंगालीत लिहिल्या आहेत. गुप्तहेर फेलूदा, तोपशे, जटायू या मध्यवर्ती व्यक्तिरेखांभोवती चित्तथरारक व उत्कंठावर्धक अशा १२ कादंबऱ्या गुंफल्या आहेत. यात रहस्य आहे पण अनाकलनीय गूढ नाही, हिंसा आहे पण हिंस्त्रपणा नाही.<br>या कथा चित्तथरारक आहेत पण यात भडकपणा नाही. गुंतागुंतीच्या या खिळवून टाकणाऱ्या कथा भारतातील विविध राज्यात, शहरात घडतात असं दाखवून सत्यजित रे यांनी रहस्य, साहस व पर्यटन यांचा रंजक मिलाफ साधला आहे. प्रथितयश अनुवादक अशोक जैन यांनी अनुवादित केलेल्या या कादंबऱ्या केवळ किशोरवयीनांनाच नव्हे तर आबालवृद्धांनाही खिळवून ठेवतील हे निश्चित! |
| 38 | सुरस गोष्टी | अरेबियन नाइट्स या जगप्रसिद्ध ग्रंथातल्या अनेक गोष्टींची अनेक भाषांमध्ये भाषांतरं, रूपांतरं झालेली आहेत. शेकडो वर्षं झाली तरी अजूनही त्यांची मोहिनी कायम आहे. नवनवीन लेखकांची नवीन भाषांतरं अजूनही प्रकाशित होत आहेत. या पुस्तकातल्या गोष्टींची कथाही अशीच सुरस आहे! माधुरी भिडे यांनी सोप्या भाषेत रसाळ पद्धतीने यातल्या गोष्टी कथन केल्या आहेत. |

| | | |
|---|---|---|
| 39 | त्या एका दिवशी | मुलांसाठी दोन दीर्घकथा - 'त्या एका दिवशी' आणि 'मला क्रियापद भेटते तेव्हा'.<br>त्या एका दिवशी<br>गौतमचं खरं म्हणजे आपल्या आईबाबांवर प्रेम होतं; पण हल्ली काहीतरी बिनसलं होतं.<br>त्याला त्यांचं काहीच पटेनासं झालं होतं. पूर्वी असं होत नसे. मग उन्हाळ्याच्या सुट्टीत त्या एका दिवशी<br>बाबाबरोबर केलेला प्रवास एक वेगळाच अनुभव देऊन गेला आणि आई-बाबांना जाणवलं,<br>की गौतम आता मोठा झाला आहे; मोठा, शहाणा आणि समजूतदार....<br><br>मला क्रियापद भेटले तेव्हा...<br>‘मला क्रियापद भेटले तेव्हा...’ हा काय निबंधाचा विषय आहे?<br>पण सरांनी तो दिला आणि चिन्मयीची चिडचिड झाली.<br>पण लिहिता लिहिता तिला एका क्रियापदाबरोबर झालेल्या कितीतरी भेटीगाठी आठवत गेल्या :<br>मजेदार, हळव्या, दुखऱ्या, मनाच्या आतल्या कप्प्यात जपून ठेवाव्यात अशा आठवणी. |

| | | |
|---|---|---|
| 40 | तैमुरलांगचा भाला | किशोर साहस कादंबरी साधारणपणे दहा ते सोळा वर्षांच्या मुलांसाठी आहेत. वयाचे पहिले दशक ओलांडताना मुले अद्भुत आणि वास्तव यांच्या सीमेवर कुठेतरी असतात. राजा-राणी, राक्षस व पऱ्या यांची मोहिनी अद्यापि मनावरून गेलेली नसते. पण त्याच बरोबर दृष्टी हळूहळू सभोवतालच्या जगात ज्या साहसी घटना घडत असतात- किंवा घडाव्यात असे त्यांना वाटते-तिकडे वळलेली असते.<br>तेरा-चौदा वर्षांच्या मुलांनी अद्भुत गोष्टींकडून वस्तुनिष्ठ साहस-कथांकडे निश्चितपणे वळावे असे मला स्वतःला वाटते. विज्ञानाने एवढी मोठी 'खरी' जादू आटोक्यात आणलेली असताना आपण अजून राक्षसी जादू नि मंत्रतंत्रच उगाळीत बसावे का? हं-गंमत म्हणून काही काळ ठीक आहे. पण किती काळ? अल्लाउद्दिनाचा जुना दिवा देऊन एडिसनचा नवा दिवा घेण्याची वेळ किशोर जीवनातही लवकर यायला हवी असं नाही आपल्याला वाटत?<br>तरी पण वयाच्या दुसऱ्या दशकाच्या निदान पूर्वार्धावर तरी पहिल्या दशकाची छाया पडलेली असते हे खोटे नाही. या वयाच्या अनेक किशोरांना राक्षस, राजपुत्र नि जादूटोणा अजूनही हवा असतो. हे लक्षात घेऊन प्रस्तुत 'किशोर साहस' संचात पाचांपैकी दोन कादंबरिका मुद्दाम त्या पठडीतल्या निवडल्या आहेत. सौ. मालतीबाई दांडेकर यांची कुमार अनिरुद्ध आणि श्री. ग. वि. साळवी यांची शरावतीचा शोध या भाषा व कथानक या दोन्ही कसोट्यांना उत्तम प्रकारे उतरणाऱ्या कादंबरिका आहेत यात वाद नाही. कुमार अनिरुद्धाचे साहस तर साधेसुधे नाही. त्याला तत्त्वाची बैठक आहे.<br>मुलांप्रमाणे मुलींना साहस नको असते असे मुळीच नाही. त्यांनाही पराक्रम करावासा वाटतो. साहसबहाद्दर मुलींच्या कथांची तर मराठीत जवळजवळ वानवाच आहे. त्या दृष्टीने सौ. लीलावती भागवत यांचे 'मचव्यातलं साहस' सर्वांना स्वागतार्ह वाटेल. सौ. सुशीला चिकटे यांच्या 'अद्भुत ढोलवादक' चा प्रकार आणखी निराळा. ही एक चटका लावणारी रहस्यकथा आहे आणि रहस्यात गुरफटताना खूश न होणारे बालवाचक फारच विरळा असतील! 'तैमुरलंगाचा भाला' मध्ये बेचाळीसच्या क्रांतिकाळातला एक धमाल प्रसंग रंगवला आहे. त्यातली सर्व पात्रे- आणि विशेष लता-किरण-काल्पनिक असली तरी त्यातले मध्यवर्ती प्रसंग मुंबईच्या परिसरात घडलेले आहेत हे आपण जाणतोच.<br>'किशोर साहस' च्या वळलेल्या मुठीत असा पंचरंगी मेवा आहे. शक्य तेवढी विविधता साधलेली आहे. आणि तेच बरं. कारण पाची |

| | | |
|---|---|---|
| 41 | डाकू बनला डिटेक्टिव्ह | तुरुंगात बसल्या बसल्या बाहेर डाका!<br>“शरलॉक होम्सला अखंडपणे चॅलेंज देणारा एक विकृत बुद्धीचा प्राध्यापक गुन्हेगार होता हे तुम्हाला माहीत आहेच -”<br>“माहीत आहे,” बिपिनला मध्येच अडवून विजू म्हणाला, “प्रोफेसर मोरिआर्टी!”<br>ोच, असाच एक बुद्धिमान डाकू फ्रान्सच्या साहित्यसृष्टीत होऊन गेला. आर्सेन ल्यूपिन हे त्याचं नाव. मॉरिस लेब्लँक नावाच्या लेखकाने त्याच्या गोष्टी लिहिल्या आहेत. अनेक हुशार पोलिसांना या चोराने धूळ चारली!<br>“त्याला कोणी शरलॉक होम्स भेटला नाही वाटतं?”<br>“नाही. तो एक प्रसिद्ध घरफोड्या होता आणि एकदा तर त्याने तुरुंगात बसल्या बसल्या बाहेर डाका घालून साऱ्या युरोपला थक्क केलं होतं?”<br>“काय सांगतोस?”<br>“तुरुंगात बसल्या बसल्या?”<br>“होय, बसल्या बसल्या!” आता गोष्ट सांगणे चुकत नाही हे ओळखून बिपिन स्वतः ठाकठीक बसला.<br>ान्समधली प्रख्यात सेइन नदी दक्षिणेकडे वाहत जाऊन समुद्राला मिळते. अगदी अखेरी-अखेरीला तिचे पात्र विलक्षण रुंद झाले असून, त्यात काही मोठी मोठी बेटे आहेत. अशाच एका खडकाळ बेटावर मलाकी नावाचा एक विचित्र किल्ला बांधलेला आजही आढळतो. पलीकडच्या डोंगरावरून गडगडत आलेला एक प्रचंड कातळ जणू नदीकाठच्या मुरबाड जमिनीत रोवला गेला आणि त्यावरच एक अभेद्य जलदुर्ग उभारण्याची बुद्धी पूर्वकाळी कोणातरी सरदाराला झाली. किल्ला सर्व बाजूंनी अभेद्य असून, त्याचा एकंदर थाट सरंजामी युगातला आहे. पण पुढे कालांतराने सरदारमहाशयांनी तो टाकून दिला आणि नंतर त्यात वटवाघळांखेरीज इटली, फ्रान्समध्ये सोकावलेल्या दरोडेखोरांनी आसरा घेतला असे म्हणतात. या किल्ल्याच्या तळाखालून अनेक भुयारवाटा गेलेल्या आहेत म्हणे. त्यामुळे चोरांना लपायला ती एक छानच जागा झाली होती. पण पुढे पोलिसांनी त्यांचा पिच्छा पुरवून त्यांची हकालपट्टी केल्यावर बरीच वर्षे ही जागा ओस पडली होती. अगदी अलीकडे एका हौशी धनाढ्य गृहस्थाच्या ती नजरेत भरली आणि त्यांनी ती सारी इस्टेट खरेदी करून टाकली. हे गृहस्थ आधुनिक काळातले असले तरी तेही एका बड्या उमराव घराण्यातले होते. त्यांनी ती जुनी पडीक वास्तू कशासाठी खरेदी केली, हे तुम्हाला सांगितलं तर नवल वाटेल. या माणसाजवळ प्रचंड संपत्ती होती. पण त्याने कधी लग्न केलं नाही. तीन वयस्क नोकरांना घेऊन तो भुतासारखा त्या किल्ल्यात राहायचा. एवढ्या मोठ्या ाड्यात तो करायचा तरी काय? त्याला जुन्या दुर्मिळ ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करण्याचा छंद होता. रुबेन्स, रेम्ब्राँ यासारख्या नामवंत चित्रकारांची अस्सल रंगचित्रे, रोदिनसारख्या जगद्विख्यात शिल्पकारांनी नि कारागिरांनी कोरलेली शिल्पे अन् काष्ठकलाकृती, आठवा हेन्री अन् एलिझाबेथ यांच्या काळातील खास बनावटीचे फर्निचर, इतकेच नाहीतर लिलावात भरमसाट किंमती देऊन घेतलेले युरोपच्या अनेक राजवाड्यांतले जडजवाहीर यांचा बॅरनसाहेबांनी एक मोठा म्युझियमच तयार केला होता.”<br>“बाप रे!” मोना म्हणाली, “मग तो बघायला दूरदूरचे लोक येत असतील?” |

| | | |
|---|---|---|
| 42 | फास्टर फेनेचा कंफु | प्रकाशकाचे मनोगत<br>मुलांनो,<br>तुमचे आवडते लेखक भा. रा. भागवत यांनी तुम्हाला एक जानी दोस्त दिला- फास्टर फेणे!<br>या फा. फे. च्या एका पाठोपाठ एक अशा वीस पुस्तकांतून तुम्हाला त्याच्याबरोबर हिंडवलं. भागवतांच्या आठवणी म्हणून तुम्हाला या फास्टर फेणेच्या कंपूबद्दल आणि त्यांच्याबद्दल इतरही काही महत्त्वाचं सांगावं असं ‘दै. सकाळ’चे संपादक श्री. अनंत दीक्षित यांना वाटलं. त्यांनी लीलावती भागवत यांना तसं सुचवलं. त्यांनी ‘हो’ म्हटलं आणि मग सुटीच्या पानात रोज एक असे एकूण सतरा लेख तुम्हाला फास्टर फेणेच्या कंपूबद्दल वाचायला मिळाले. आणखी एक लेख ‘सुपर ज्यूनिअर टाइम्स’ यात नंतर आला. पुष्कळशा मुलांनी ‘सकाळ’मधले सगळे लेख वाचले. तसं कळवलं देखील. पण सगळ्याच मुलांना ते क्रमश: किंवा सगळे वाचायला मिळाले असं नाही. तेव्हा त्या सर्व लेखांचं एक पुस्तकच छापायचं ठरवलं. तेच हे छोटं पुस्तक. फा. फे. च्या वीस पुस्तकांचा संच घेणाऱ्याला हे पुस्तक भेटीदाखल देणार आहोत आम्ही.<br>धडपड्या फास्टर फेणेला थोडी विश्रांती द्यावी असं वाटून भागवतांनी तुम्हाला दुसरा एक हीरो दिला. थोडा मोठ्या वयाचा बिपिन बुकलवार. विनू आणि मोना या दोन मुलांना घेऊन यानंही साहसं केली. ‘घड्याळाचे गुपित’, ‘मुंबईला चक्कर’, ‘दुर्मिळ तिकिटाची ाहसयात्रा’, ‘अक्काचं अजब इच्छासत्र’ या त्यांच्या साहसाच्या चार कादंबऱ्या. हा बिपिन धाडसी होताच; पण पुस्तकवेडाही होता. जुनी दुर्मिळ पुस्तकं वाचून काढायची हा त्याचा छंद, पण नुसतं स्वतः वाचून त्याचं समाधान होईना. कारण तो होता गोष्टीवेल्हाळ. मग विनू-मोना मागे लागयची आणि त्यांना आणि त्यांच्या मित्रमंडळींना बिपिन त्या वाचलेल्या गोष्टी खुलवून सांगायचा- “बिपिन बुकलवार सांगतो आहे.”<br>या सगळ्या रंगतदार गोष्टींची पुस्तकं आहेत : ‘अक्काचे अजब इच्छासत्र’, ‘दुर्मिळ तिकिटाची साहसयात्रा’, ‘मुंबईला चक्कर’, ‘साखरसोंड्या’, ‘थँक्यू मि. शार्क’, ‘जुनाट भावळीची भन्नाट कथा’, ‘दर्याई डाकू सार्की’, ‘डाकू बनला डिटेक्टिव्ह’ इ.<br>फास्टर फेणेची पुस्तकं नव्याने पुन्हा आणि बिपिनची ही पुस्तकं तुमच्या भेटीला लवकरच येत आहेत. भागवतांची इतर काही छोटी, मोठी चटकदार गोष्टींची पुस्तकं पण आहेत. त्यात ‘मायापूरचे रंगेल राक्षस’, ‘जंगल बुकातील दंगल आणि त्या दंगलीतील दोन पोरगे’.<br>हा सगळा पुस्तकांचा खजिना तुम्हाला तुमच्या<br>सगळ्या सुट्ट्यांमधून वाचायला पुरणार नाही एवढा<br>मोठा आहे. तेव्हा या आता तो लुटायला!<br>- सौ. सविता जोशी |
| 43 | घड्याळ चे गुपित | भा रा भागवत यांची झकास कादंबरी...... बालावाचाकांसाठी |

| | | |
|---|---|---|
| 44 | पंच तंत्र | पंचतंत्र हा नीतिकथांचा संग्रह आहे, हे आपण पाहिले आहे. पंचतंत्राच्या प्रारंभीच’कथामुखा’ मध्ये त्याचे रचना प्रयोजन स्पष्ट केलेले आहे अमरशक्ती राजाच्या तीन’शास्त्रविमुख’ आणि’विवेकरहित’ अशा पुत्रांना केवळ सहा महिन्यांच्या काळात’नीतिशास्त्रज्ञ’ बनविण्याचे आव्हान स्वीकारून विष्णुशर्म्याने हा नीतिबोधक कथांचा संग्रह एका सूत्रात गुंफला आहे. म्हणजे पंचतंत्राचे श्रोते आहेत तीन राजकुमार, जे शास्त्रविमुख आणि विवेकरहित आहेत. त्यांना नीतीचे ज्ञान हवे आहे; पण ती नीती आहे ऐहिक जीवनाशी संबद्ध, धर्म, अर्थ आणि काम या त्रिविध पुरुषार्थांशी संबद्ध, मोक्षसाधनेशी त्यांना कर्तव्य नाही. त्याचमुळे मनू आदींनी ांगितलेले धर्मशास्त्र, चाणक्य आदींनी सांगितलेले अर्थशास्त्र आणि वात्स्यायन आदींनी सांगितलेले कामशास्त्र यांचे ज्ञान राजकुमारांना व्हावे, त्यांच्या ठायी बुद्धिप्रकाश फाकावा, अशीं राजाची इच्छा आहे. परंतु जीविताची मर्यादा आणि ज्ञानाची असीमता व अनंतता ध्यानी घेता हे सारे ज्ञान संक्षेपाने, पण नेमकेपणाने प्रात झाले पाहिजे, ते केवळ पुस्तकी न राहता ्यवहाराच्या, नाना जीवनप्रसंगांच्या संदर्भासह प्राप्त झाले पाहिजे, अशी राजाची स्वाभाविक अपेक्षा आहे. विष्णुशर्म्याने जो कथारूपाचा आश्रय केला आहे, तो या जीवनसंदर्भांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण पंचतंत्रातल्या कथासंभारांतून उमलून आलेले नीतिशास्त्र हे तत्त्वजड राहिलेले नाही; केवळ सुभाषितभांडारासारखे बनलेले नाही; तर नाना प्रकारच्या जीवनसंदर्भांत वासू सोबत करणाऱ्या मित्रासारखे’ बनले आहे. पंचतंत्राचे श्रोते हे’नीतिशास्त्रज्ञ’ होण्याची अपेक्षा राखून अध्ययनाला प्रवृत्त झालेले आहेत, हे आपण कथामुखावरून पाहिलेच आहे. पंचतंत्रातील कथांमधून जी नीती परिस्फुटीत होत आहे, ती नीती मोक्षप्रवण धर्माशी संबद्ध नसून इहप्रवण राजनीतीशी आणि व्यवहारचातुर्याशी संबद्ध आहे. हे इहलोकीचे जीवन वैयक्तिक आणि सामूहिक संदर्भात यशस्वी कसे करावे, त्यात अवधान कसे सांभाळावे, वंचना कशी टाळावी, विपरीत प्रसंगांवर मात कशी करावी आणि’शठं प्रति शाठ्यम्’ या तत्त्वाचा अवलंब करून जीवन संघर्षात टिकाव कसा धरावा, याचाच बोध पंचतंत्रातल्या कथांतून उमलून येतो. ्हणजे पंचतंत्रातल्या नीतिकथा या चातुर्यकथा आहेत; व्यवहार नीतिकथा आहेत. या कथा वाचताना’येथ चातुर्य शहाणे झाले !’ अशी जाणीव वाचकांच्या मनात जागल्यावाचून राहत नाही. |
| 45 | भालु शिकारी | साहस ही अशी घटना किंवा मालिका असते जी बऱ्याचदा शारीरिक कृतीतून मुख्यत्वे धोक्यासह नायकांच्या सामान्य जीवनाबाहेर घडते. साहसी कथा जवळजवळ नेहमीच द्रुतपणे पुढे सरकतात आणि कथानकाची गती कमीतकमी तेवढीच वैशिष्ट्यपूर्णता, सेटिंग आणि सर्जनशील कार्याच्या घटकांइतकीच महत्त्वाची असते.<br>लिखित कल्पित साहित्याच्या सुरुवातीच्या दिवसांपासून साहसी ही एक सामान्य थीम आहे. खरंच, मध्ययुगीन प्रणयांचा मानक प्लॉट साहसी मालिका होता. हेलियोडोरस इतक्या जुन्या कथानकाच्या चौकटीचे पालन करून आणि हॉलिवूड सिनेमांमध्ये अद्याप जिवंत राहण्याइतके, एखाद्या नायकाला आपल्या बाईला भेटण्यापूर्वी प्रथम आव्हानांचा सामना करावा लागतो. दुसऱ्या आव्हानांचा एक संच पुन्हा एकत्रित होण्यापासून विभक्त होईल. |
| 46 | अंधारामध्ये प्रकाश | जर आपल्यावर प्रेम आणि प्रेमळ लोक हवेमध्ये गायब झाले तर आपण काय कराल? एखाद्या जागतिक हुकूमशहाने नेलोग्राफिक जीवनासारखी मूर्ती तयार केली आणि आपण त्याची पूजा करावी अशी मागणी केली तर तुम्हाला काय वाटेल? स्टॅन आणि elडले कटे टिकण्यासाठी त्यांच्या प्रियजनांनी सोडले आहेत. कोणीही त्यांच्या वाईट स्वप्नातून कसे सुटू शकेल याकडे वळण्याशिवाय. सस्पेंस ऑफ मास्टरची ही एक रोमांचक कादंबरी आहे. आपल्याला ते वाचण्यास आवडेल. |

| | | |
|---|---|---|
| 47 | चिऊताई चा हार | चिऊताचा हर 'मुलांसाठी हे कविता पुस्तक आहे. प्रशांत राऊत यांनी लिहिलेले. भरारी पुलिकेशन (मुंबई) द्वारा प्रकाशित |
| 48 | जेशुची गोष्ट व इतर | राक्षस मशीनमध्ये त्याची आई गहाळ आहे. विमानाने उड्डाण करण्याची भीती आहे. दोन शेजारी देशांचे राजे गहाळ झालेल्या किलकिल्यावरून भांडत आहेत. पुढे काय होते ते जाणून घेऊ इच्छिता? मराठी भाषेत लिहिलेल्या यमकांच्या ओठांसह कथांचा हा संग्रह वाचा. मुले आणि प्रौढांसाठी मनोरंजक आणि आकर्षक. मुलांच्या साहित्यातील नाविन्यपूर्ण प्रयोग .राक्षस मशीनमध्ये त्याची आई गहाळ आहे. विमानाने उड्डाण करण्याची भीती आहे. दोन शेजारी देशांचे राजे गहाळ झालेल्या किलकिल्यावरून भांडत आहेत. पुढे काय होते ते जाणून घेऊ इच्छिता? मराठी भाषेत लिहिलेल्या यमकांच्या ओठांसह कथांचा हा संग्रह वाचा. मुले आणि प्रौढांसाठी मनोरंजक आणि आकर्षक. मुलांच्या साहित्यातील नाविन्यपूर्ण प्रयोग . |
| 49 | मुंग्यांची शाळा | मुन्यांची शाला 'हे कविता पुस्तक आहे. प्रशांत राऊत यांनी लिहिलेले |
| 50 | चिंना | चिन्ना हा खोडकर आणि आदिवासी मुलगा निसर्गावर प्रेम करत साधं आयुष्य व्यतित करत असतो.<br>पण लहान असूनही हा चोरटे शिकारी, लाकूड तोडणारे चोर, अगदी माणसाच्या जीवावर उठणारा नरभक्षक वाघ अशा अनेक संकटांवर आपल्या चलाख बुद्धीने मात करतो.<br>सुप्रसिद्ध चित्रकार पुण्डलीक वझे यांच्या चित्रांनी नटलेली बालकादंबरिका. |
| 51 | मोहणस्वामी | ोहनस्वामीने नुकताच आपला प्रियकर कार्तिकला एका महिलेपासून हरवले आहे. तो आपल्या आयुष्याकडे वळून पाहतो आणि त्याने निवडलेल्या निवडी, त्याला जिंकलेले मित्र आणि जे लोक हरवले ते आठवते. एक साधे जीवन, कृपा व सन्मान यांचे आयुष्य, र्जिनवर न येणारे असे आयुष्य हे त्याचे स्वप्न आहे. त्याने स्वतः व्हावे आणि आपल्या भूतकाळाचा अपमान मागे घ्यावा, ही नावे ज्याचे नाव त्याला लहानपणी मुलीसारखे आणि पुढे मुलांकडे आकर्षित व्हावे यासाठी म्हटले गेले होतेमोहनस्वामीने नुकताच आपला प्रियकर कार्तिकला एका महिलेपासून हरवले आहे. तो आपल्या आयुष्याकडे वळून पाहतो आणि त्याने निवडलेल्या निवडी, त्याला जिंकलेले मित्र आणि जे लोक हरवले ते आठवते. एक साधे जीवन, कृपा व सन्मान यांचे आयुष्य, मार्जिनवर न येणारे असे ायुष्य हे त्याचे स्वप्न आहे. त्याने स्वतः व्हावे आणि आपल्या भूतकाळाचा अपमान मागे घ्यावा, ही नावे ज्याचे नाव त्याला लहानपणी मुलीसारखे आणि पुढे मुलांकडे आकर्षित व्हावे यासाठी म्हटले गेले होते |

| | | |
|---|---|---|
| 52 | रोग बरा करणारे मांजर | तिला भेट देण्याच्या मुळे, सिलेस रोग बरा करणारे मांजर शेजार्]यामध्ये फारच आनंदी सदस्य आहे. जसे परिचारीकेचे आवडते हो तिला तिचा आळशी दिवस घराच्या ऊबेत घालवायला आनंद वाटत असे.<br>पण नंतर, एक आई ससा वादळामध्ये मदतीसाठी विचारणा करते. तिची चिकाटी रोग बरा करणार्]या मांजराला रात्रीच्या हिमवादळात व नाखुशीला बर्फात घेऊन तिच्या नाराजीला हरवतो. एका गर्द जंगलामध्ये सिलेस डरावण्या आश्चर्यला समोरी जाते आणि तिला तिची शक्ती गोळा करणे भाग पडते.<br>एकदाची मोठी रात्र आणि यशस्वी सफर संपली सूर्य फक्त बर्फाळ जंगलाला नाही तर रोग बरा करणार्]यामांजराच्या हृदयाला ऊब देत बाहेर येते. |